# अकराव्या प्रो कबड्डी लीग स्पर्धेत पुणेरी पलटणची दमदार विजयी सलामी

- चौफेर चढायांना बचावपटूंची भक्कम साथ
- गौरव खत्रीची चमकदार कामगिरी

हैदराबाद, १९ ऑक्टोबर २०२४-

गतविजेत्या पुणेरी पलटण संघाने प्रो कबड्डी लीगच्या ११व्या पर्वाला दिमाखात सुरुवात केली. पहिल्या सामन्यात शनिवारी पुणेरी पलटणने हरियाणा स्टिलर्सचा एकतकर्फी लढतीत ३५-२५ असा पराभव केला.

हैदराबाद येथील गच्चीबावली क्रीडा संकुलात सुरु असलेल्या लीगच्या दुसऱ्या दिवशी पुणेरी पलटणचा वर्चस्वपूर्ण खेळ आकर्षण ठरला. अस्लम इनामदार, पंकज मोहिते आणि मोहित गोयतच्या यशस्वी चढायांना गौरव खत्री आणि अमन या दोन्ही कोपरारक्षकांनी दिलेली सुरेख साथ पुणेरी पलटणच्या विजयाचे वैशिष्ट्य ठरली.

दुसरीकडे पलटणच्या चढाईपटूंना रोखणे हरियाणा स्टिलर्सच्या बचावपटूंना जमलेच नाही, तर त्यांचे चढाईपटू पलटणची तटबंदी तोडू शकले नाही. पलटणच्या चढाईपटूंना उत्तरार्धात तिसऱ्या चढाईवर आलेले अपयश हीच काय ती त्यांच्यासाठी चिंतेची बाब ठरली. महंमद शादलुईच्या बचावामुळे पलटणचे चढाईपटू तिसऱ्या चढाईच्या नियमात अडकून पडले होते. पण, याचा फार मोठा फरक निर्णयावर पडला नाही.

पलटणने चढाईत २६ आणि बचावात १२ गुणांची कमाई करताना एकतर्फी वर्चस्व सिद्ध केले. दोन्ही सत्रात त्यांनी एकेक लोण चढवला. चढाईत अस्लम इनामदारने ५, तर पंकज मोहिते, मोहित गोयतने प्रत्येकी चार गुणांची कमाई केली. बचावात गौरवने ७, तर अमनने ४ गुण मिळविले. हरियाणा स्टिलर्सकडून शिवम पठारे आणि संस्कार मिश्राने प्रत्येकी ५, तर शादलूईने चार गुणांची कमाई केली.